# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/05/2023 (सोमवार) दुपार


## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन खापरखेडा यांची कारवाई

पो.स्टे. खापरखेडा:— अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा भानेगाव येथे दिनांक २१/०५/२०२३ चे ११/३० वा. ते १२/१० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ हा पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, मौजा भानेगाव येथुन रेतीची चोरटी वाहतुक ट्रकने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा भानेगाव येथे नमुद **आरोपी नामे— वसंता संभाजी गायकवाड, वय ५३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६ सिध्दार्थ नगर महादुला कोराडी. ता. कामठी** याने आपले ताब्यातील टाटा कंपनीची ६ चक्का ट्रक क्र. एम.एच. —३१. सी. क्यु. —९४९७ मध्ये विना परवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन १) २ ब्रास रेती प्रत्येकी किंमती अंदाजे ४,०००/—रू प्रमाणे एकुण अंदाजे किंमती ८,०००/—रू. २) टाटा कंपनीची ६ चक्का ट्रक क्र. एम.एच.— ३१. सी. क्यु.— ९४९७ अंदाजे किंमती ५,००,०००/—रू असा एकुण ५,०८,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे फिर्यादी नामे— पो.ना. राजु विश्वनाथ भोयर रा. पो.स्टे. खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. कैलास पवार, पोस्टे खापरखेडा. मो. नं. ८०८००८८५२८ हे करीत आहे

## चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत कबाडीच्या दुकानाजवळ संताजी नगर कन्हान येथे दिनांक २१/०५/२०२३ चे ०१/०० वा. ते ०१/३० वाजता दरम्यान ड्रायव्हर नामे— रूपेश कुंभारे रा. कामठी हा ओ. सी. एम परिसरात पेट्रोलिंग करित असतांना फुकट नगर नाल्या जवळ एक मारूती ८०० च्या गाडीचा नंबर ०५०३ अर्धी नंबर प्लेट तुटलेली दिसली तसेच तिला थांबवण्यासाठी हात दिला तर तो न थांबता कन्हान हाईवे रोडनी पळु लागला त्याचा पाठलाग केला असता संताजी नगर कबाडीच्या दुकाना जवळ गाडी अडविली असता त्यातील चालक गाडी खाली उतरून गाडी सोडुन पसार झाला त्याचे नाव नाईद उर्फ मोहम्मद अमजा सैय्यद असुन त्याची गाडी चेक केली असता त्या मध्ये कोळसा दिसुन आला अशी माहीती दिल्याने फिर्यादीने संताजी नगर येथे येवुन सदर गाडी मध्ये कोळसा दिसुन आल्याने कन्हान पोलीसांना बोलावुन त्यांच्या मदतीने पोलीस स्टेशनला गाडी आणली. आरोपी मारूती ८०० नंबर ०५०३ च्या गाडीत अंदाजे कोळसा ८०० ते ९०० किलो किंमती अंदाजे ७६००/—रूपयाचा मुद्देमाल चोरी करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चव्हान पोस्टे कन्हान हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर